वृत्तपत्राचे नांव - पुण्यनगरी
दिनांक - 23/9/2016

# मानवी हक्कांची जपणूक हे कर्तव्यच : न्या. बन्नूरमठ

## विद्यापीठात मानवी हक्क विषयक कार्यशाळेस प्रारंभ

सोलापूर / प्रतिनिधी

आज जागतिकीकरणाच्या युगात मानव अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचाराचा बनत चालला आहे. समाजाची ही मानसिकता बदलली पाहिजे. प्रत्येकाचा मानवतेवरील विश्वास दृढ पाहिजे. विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक करणे हे सर्वांचे कर्तव्यच आहे, असे प्रतिपादन केरळ उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.आर. बन्नूरमठ यांनी केले.

### न्यायमूर्ती बन्नूरमठ म्हणाले,

राज्य मानवी हक्क आयोगामार्फत अनेकांना न्याय मिळवून देता आला याचे समाधान आहे. सार्वजनिक प्राधिकरणात कार्य करणाऱ्या व्यक्ती मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारींबाबत योग्य कार्यवाही करीत नसतील तर, अशा व्यक्ती व प्राधिकरणावर कारवाई करुन सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम आम्ही करतो. आयोगाकडे आलेली प्रकरणे निकाली काढताना आम्ही अर्जदाराकडून कोणतेही शुल्क आकारत नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन कोठे होत असेल तर कोणीही यासंदर्भात आयोगाकडे याची माहिती देऊ शकतो. गरज पडल्यास आयोग स्वतः होऊन काही प्रकरणात करवाई करू शकतो.

सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलातर्फे आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'ह्यूमन राईट्स अॅन्ड ह्यूमनायजिंग सोसायटीज' हा विषय असून, विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात सदर दोन दिवसीय कार्यशाळेस गुरुवारी (दि. २२) प्रारंभ झाला आहे. अध्यक्षस्थानी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.एन. एन. मालदार होते. व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए.सईद (सेवानिवृत्त प्रधान सचिव विधी व न्याय विभाग) व आय.पी.एस. भगवंतराव मोरे, कुलसचिव डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ. ई.एन. अशोककुमार, चर्चासत्राचे समन्वयक डॉ. माया पाटील, डॉ. प्रकाश व्हनकडे उपस्थित होते. तर, हैद्राबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, म्हैसूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मुजफ्फर असादी, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके या चर्चासत्रातील वक्त्यांसह बी.सी.यू.डी. संचालक प्राचार्य आर.वाय. पाटील, विविध संकुलांचे संचालक, अध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. मालदार म्हणाले की, आपण आपल्या हक्कांबाबत जेवढे जागरुक असतो. तेवढाच इतरांच्याही मानवी हक्कांचा विचार करुन, त्यानुसार आपल्या वागणुकीत बदल केले पाहिजेत.

पहिल्या सत्रात आयोगाचे सदस्य एम.ए. सईद म्हणाले की, मानवी हक्क हे प्रत्येकाला जन्मतःच प्राप्त होणारे हक्क आहेत व हे कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत असे हक्क आहेत. शिक्षण हे मानवी हक्कांची जाणीव करुन देणारे महत्वाचे साधन आहे. मानवी हक्कांबाबत अलिकडच्या काळात चांगले कार्य झाले आहे. मानवी हक्कांबाबत आणखी महत्वपूर्ण कार्य होण्यासाठी लोकांनी खुल्या मनाने विचार करण्याची व मानवी हक्कांची जपणूक करण्याची गरज आहे.



विद्यापीठात मानवी हक्क विषयक राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.आर. बन्नूरमठ, सदस्य एम.ए.सईद, आय.पी.एस. भगवंतराव मोरे, कुलगुरू डॉ.एन.एन. मालदार, डॉ.ई.एन. अशोककुमार, डॉ. माया पाटील.

आयोगाचे सदस्य आयपीएस भगवंतराव मोरे म्हणाले की, राज्य मानवी हक्क आयोग प्रसंगी तपास करुनही कारवाई करतो. काहीजण खोटे दस्तावेज तयार करुन, मानवी हक्काच्या क्षेत्रात कार्य करतो असे भासवून गैरवापर करतात, त्यांच्यावर कारवाई करणार आहोत. यानंतर दुपारच्या सत्रात मुजफ्फर असादी यांचे व्याख्यान झाले. शुक्रवारी (दि. २३) हैद्राबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दिन, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके आदींची व्याख्याने होणार आहेत.